# घोषणा

**विषय-** आयोगातील परीक्षांमध्ये आकृत्यांवर / नकाशांवर आधारीत प्रश्नांच्या मुल्यांकनात दृष्टीहीन/ क्षीणदृष्टी उमेदवारांना सवलत देण्याबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणा-या परीक्षांमधील बहुतांश प्रश्नपत्रिका या वस्तुनिष्ठ बहुपर्यायी असतात. यातील काही प्रश्नपत्रिकांमध्ये काही मोजके प्रश्न आकृत्यांवर आधारीत / नकाशांवर आधारीत असतात. अशा प्रश्नांचे नेमके आकलन होण्यास दृष्टीहीन/क्षीणदृष्टी उमेदवांराना अडचणी येतात. त्यामुळे इतर उमेदवारांच्या तुलनेत अशा उमेदवारांसाठी नकाशा/ आकृत्यांवर आधारीत प्रश्न प्रतिकूल ठरतात. सदर असमानता दूर करण्याचे आयोगाच्या विचाराधीन होते. त्या अनुषंगाने आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक २८/९/२०१७ रोजी घोषणा करण्यात येऊन संबंधीतांकडून सूचना/हरकती मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त सूचना/हरकतींवर विचार करुन व व्यवहार्यता तपासून आयोगाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

"आयोगाच्या परीक्षेतील वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांपैकी **आकृत्या किंवा नकाशांवर आधारीत प्रश्न सोडविण्यापासून दृष्टीहीन/ क्षीणदृष्टी उमेदवारांना सूट देण्यात यावी व प्रश्नपत्रिकेतील उर्वरीत प्रश्नांच्या उत्तरांच्या आधारे, प्रमाणबद्ध वेटेज देऊन त्यांचे मुल्यांकन करण्यात यावे**. असा आयोगाने निर्णय घेतला आहे. उदा. १०० प्रश्न व १०० गुणांच्या प्रश्नपुस्तिकेत आकृत्यांवर/ नकाशांवर आधारीत ४ प्रश्न असल्यास असे ४ प्रश्न दृष्टीहीन/ क्षीणदृष्टी उमेदवारांनी सोडविणे आवश्यक नाही. उर्वरीत ९६ प्रश्नांमध्ये अशा उमेदवारांनी मिळविलेले गुण १०० पैकी गुणांत रुपांतरीत करण्यात येतील. उदा. ९६ पैकी ४८ गुण मिळाले असल्यास सदर गुण १०० पैकी किती या प्रमाणे रुपांतरीत केले जातील. वरील उदाहरणात ९६ पैकी ४८ गुण म्हणून १०० पैकी ५० गुण (रद्द करण्यात आलेले प्रश्न वगळून) मिळाल्याचे गृहित धरले जाईल."

प्रचलित शासन निर्णयानुसार अंधत्व/क्षीणदृष्टी प्रवर्गात मोडणा-या उमेदवारांना ही सवलत देय राहील. संबंधीत जाहिरातीत या प्रवर्गासाठी राखी व पद असले किंवा नसले तरीही, या प्रवर्गातील उमेदवारांना वरील सवलत लागू राहिल. एखाद्या परीक्षेत नेमके किती व नेमके कोणते प्रश्न आकृत्यांवर/ नकाशांवर आधारीत आहेत, ते संबंधीत प्रश्नपत्रिकेच्या **पहिल्या उत्तरतालिकेच्या घोषणेसोबत प्रसिध्द केले जाईल**. सदर निर्णय घोषणा प्रसिध्द झाल्याच्या दिनांकानंतर होणाऱ्या परीक्षांना लागू राहील.

**मुंबई** | **प्रदीप कुमार,**
**दिनांक- १९/०१/२०१८** | **सचिव**